राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन,शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्त,१९२३ द्वारा स्थापित,व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर-४४००३३

अति तात्काळ

डॉ. डी.के. अग्रवाल
संचालक, (म. वि. वि. म.)

पत्र. क्र. बीसीयुडी/राजा/२०१६/१७६
दिनांक : २३/०२/२०१६

प्रति,

प्राचार्य,
सर्व संलग्नित अद्यापक व शारिरीक शिक्षण महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ नागपूर.

**विषय : महाविद्यालयात कार्यरत विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांची अद्यावत माहिती सादर करण्याबाबत.**

**संदर्भ : शासनाचे पत्र क्र. बी.एड–४६१५/प्र.क्र.३३२/मशि–२ दिनांक ०६/०२/२०१६.**

महोदय,

आपणास कळविण्यात येते की एन.सी.टी.ई. च्या २०१४ च्या अधिसूचने नुसार बी.एड./एम.एड./बी.पीएड/एमपी.एड. या अभ्यासक्रमांचा कालावधी सत्र २०१५–१६ पासून दोन वर्षाचा झाल्यामुळे शासनाद्वारे परिपत्रक क्र **बी.एड–४६१५/प्र.क्र. १६२/१५/मशि–२ दिनांक २१/८/२०१५.** अन्वये सदर महाविद्यालयांना शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याकरीता विद्यापीठाला संलग्नित असलेल्या अध्यापक व शारिरीक शिक्षण महाविद्यालयांची तपासनी करून अहवाल सादर करण्यास कळविले होते. त्यानुसार विद्यापीठाद्वारे चौकशी समित्यां मार्फत चौकशी करून त्रृटयांची पुर्तता करण्याचे अटीवर शिफारशीसह अहवाल शासनास सादर करण्यात आले होते. परंतु शासनाद्वारे संदर्भांकीत पत्राद्वारे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अद्यापक व शारिरीक शिक्षण महाविद्यालयामध्ये एन.सी.टी.ई. च्या निकशानूसार शिक्षकीय पदांच्या आकृतीबंधाची पुर्तता होत आहे किंवा कसे याबाबत पूनर्छाननी करून सुधारीत प्रस्ताव प्रमाणित करून सादर करण्यास कळविले आहे.

त्या अनुशंगाने आपणास विनंती करण्यात येते की आपल्या महाविद्यालयात सद्यास्थितीत कार्यरत असलेल्या विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांची अद्यावत माहिती १०० रू च्या स्टॅंप पेपर वर प्रमाणित करून खालील प्रपत्रात भरून ३ दिवसाच्या आत प्रत्यक्ष दुताकरवी विद्यापीठाचे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ या विभागात सादर करावी. जेणेकरून शासनाला सूधारित अहवाल सादर करणे सोईचे होईल. जी महाविद्यालये उपरोक्त विहीत मुदतीत माहिती सादर करणार नाहीत व त्यामुळे शासनास सादर करण्यात येणाऱ्या सुधारीत अहवालात शिक्षकांच्या माहितीचा समावेश न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहिल याची कृपया नोंद घ्यावी.

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | एन.सी.टी.ई. द्वारे मंजूर प्रवेश क्षमता | एन.सी.टी.ई. च्या निकशानूसार आवश्यक असलेल्या शिक्षकांची संख्या. | विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकाचे नाव व पदनाम. (विद्यापीठ मान्यतेच्या पत्राची प्रत सोबत जोडावी) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

आपला,

(डॉ. डी.के. अग्रवाल)
संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सहपत्र : शासनाचे दिनांक ६/२/२०१६ चे पत्र.